# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

दिनांक 12.10.2018 शुक्रवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 06 केसस 06 आरोपींना अटक करून 13,940 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 06 केसस 18 आरोपींना अटक करून 76,270 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 44 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 707 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,41,400 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. एमआयडीसी – जिवानीशी ठार मारणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 11.10.18 चे 1100 वा चे सुमारास फिर्यादी सौ. सरीता संतोष मेश्राम, वय 25 वर्ष, रा. बहुजन नगर, राजु नगर, राठी लिल्लारे चे घरी, हिंगणा रोड, नागपूर यांचा आरोपी पती संतोष लक्ष्मण मेश्राम, वय 28 वर्ष, याने फिर्यादीच्या चारित्र्याच्या संशयावरून निर्माण झालेल्या वादातुन त्याचा मुलगा 1) हर्षकुमार, वय 7 वर्ष, 2) प्रिन्सकुमार, वय 4 वर्ष,(पावने चार वर्ष) यांना पो.स्टे. एमआयडीसी हद्दीत इसासनी येथील वाघधरा शिवारात असलेल्या विहीरीतील पाण्यात फेकुन त्याना जिवानीशी ठार केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे पोउपनि ए.एम. जाधव, 7972375780 यांनी आरोपीविरूध्द कलम 302 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. इमामवाडा – खंडणीची मागणी करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 11.10.18 चे 1700 वा चे सुमारास पो.स्टे. इमामवाडा हद्दीत प्लॉट नं 3,4, क्रिडा चौक, वकीलपेठ, नागपूर येथे राहणारा फिर्यादी सुलभ संजय दिवेकर, वय 22 वर्ष, हा आपल्या घराजवळील बाल्याच्या पानठेल्या जवळ उभा असतांना आरोपी क्र. 1) विशाल सोखांद्रे, वय 40 वर्ष, रा. वकीलपेठ, नागपूर, 2) गनी उर्फ पलाश वासनीक, वय 24 वर्ष, रा. रामबाग, नागपूर, 3) त्यांचा साथीदार वय 25 वर्ष हे तेथे येवून आरोपी क्र. 1 याने फिर्यादीला हात बुक्कीने मारहान केली व आरोपी क्र. 2 ने फिर्यादीस म्हटले की जादा बदमासी दिखाता है क्या असे म्हणुन त्याने चाकु काढून फिर्यादीला मर्डर करण्याची धमकी देवून आरोपी क्र. 2 याने म्हटले की मेरा नाम गनी है किसी को भी पुछ लेना गनी क्या चिज है असे म्हटले असता आरोपी क्र. 3 हा फिर्यादीला लाता बुक्क्यांनी मारायला लागला फिर्यादीने तेथुन पळुन जावून आपल्या घरी गेला असता आरोपी हे फिर्यादीचे घरी येवून आरोपी क्र. 2 याने फिर्यादीला 5 लाख रू दे नही तो दोनो भाई का मर्डर कर दुंगा असे म्हणुन फिर्यादीस चाकुचा धाक दाखवून हातबुक्कीने मारहान करून शिवीगाळ केली. याप्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे.

इमामवाडा येथे पोउपनि जाधव, यांनी आरोपीविरूध्द कलम 387,506(ब),504,323,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. कळमना – घरफोडी :**

दिनांक 10.10.18 चे 2000 वा ते दिनांक 11.10.18 चे 0630 वा दरम्यान फिर्यादी रोहीत चंद्रकुमार विरानी, वय 25 वर्षे, रा. प्लॉट नं 202, एच विंग, पिरॅमीड सिटी, नागपूर यांचे पो.स्टे. कळमना हद्दीत चिखली लेआउट येथे डी.एच.आर. इंटरप्राईजेस चे गोडावून चे कोणीतरी अज्ञात आरोपी चोरटयाने लॉक तोडून आत प्रवेश करून गोडाऊन मध्ये ठेवलेले नगदी 1,10,000 रू व साबन, पावडर, चहापत्ती इतर सामाण एकुण 6,36,518 रू चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे पोउपनि एस.एन. सोनपरोते, 9923429340 यांनी आरोपीविरूध्द कलम 461,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**5) पो.स्टे. तहसील – विश्वासघात करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 02.07.17 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे. तहसील हद्दीत टिमकी दादर पुल, उदयाबाई मंदीर मागे, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रविंद्र गंगाधर भगतकर, वय 35 वर्षे, यांची इनोवा गाडी क्र. एमएच/40/ए.आर./7607 हि विकायची आहे असे आरोपी चेतन संजय मांडवकर, वय 30 वर्षे, रा. गजराज टावर, पांझरा, कोराडी, नागपूर यास सांगीतले असता आरोपी हा गाडी घेवून गेला व गाडी 8 लाख रूपयाला मागत आहे असे फिर्यादीस म्हटले फिर्यादीने कमी किंमत देत आहे म्हणुन विकण्यास मनाई केली फिर्यादीने आरोपीला फोन करून गाडी मांगीतली असता आरोपीने गाडी बाहेर गेली आहे असे बहाने करून लागला फिर्यादीचा मित्र पंकज चौधरी हा कामानिमीत्त भंडारा येथे गेला असता त्यास फिर्यादीची गाडी दिसल्याने त्याने गाडीबाबत विचारले असता त्याने विकत घेतल्याचे सांगीतले फिर्यादी ने आरोपीला संपर्क केला असता संपर्क झाला नाही. फिर्यादी हे भंडारा येथे संजु मारूती भुरे यांचे सोबत संपर्क केला असता त्यांनी गाडी रविंद्र भगतकर यांचे कडून खरेदी केल्याचे सांगीतले त्यांना आरोपी चेतन मांडवकर याचा फोटो दाखवीला असता याने च मला गाडी विकल्याचे सांगीतले आरोपी याने फिर्यादीची कोणतीही परवानगी न घेता गाडी विकुन फिर्यादीचा विश्वासघात केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. तहसील येथे सपोनि एस.आर. परतेकी, 7722008747 यांनी आरोपीविरूध्द कलम 406 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**6) पो.स्टे. कळमना, जरीपटका – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

**1) कळमना** – दिनांक 11.10.18 चे 1030 वा चे सुमारास पो.स्टे. कळमना हद्दीत राहणारे फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि कोणाला काही न सांगता निघुन गेली बेपत्ता आहे शोध घेतला असता मिळून आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. कळमना येथे पोउपनि एस.एन. सोनपरोते, 9923429340 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**2) जरीपटका** – 11.10.18 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत पाटणकर चौक, शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, नागपूर येथे राहणारा शरद दशरथ गाडे, वय 15 वर्ष हा शाळेत जातो असे सांगुन निघुन गेला. परत आला नाही. बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळून आला नाही. याप्रकरणी फिर्यादी नम्रता आर. चौधरी, रा. पाटणकर चौक, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. जरीपटका येथे पोहवा ईश्वर, 9552976178 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**7) पो.स्टे. प्रतापनगर – जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दि. 11.10.18 चे 1730 वा चे सुमारास फिर्यादी नितीन संतोष त्रिपाठी, वय 41 वर्ष रा. फ्लॅट नं. 40, ए3, हॅरेस्ट कॉलनी, नागपूर हे पो.स्टे. प्रतापनगर हद्दीत आयटी पार्क, परसिस्टड क्लासेस समोर उभे असता अंदाजे 22 ते 23 वर्ष वयोगटातील दोन अनोळखी आरोपी इसम यमाहा एफझेड गाडीवर येवून जोर जोराने ओरडून फिर्यादीस शिवीगाळ केली. तसेच तुम हमको जानते नही क्या हम यहॉ के दादा है असे बोलून एकाने आपल्या जवळील पिस्टल काढून फिर्यादी व विद्यार्थ्याकडे उगारून चार्ज करून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. प्रतापनगर

येथे सपोनि पेठे, 9923198863 यांनी आरोपीविरूध्द कलम 307,34 भादंवि सहकलम 3/25 आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>8) पो.स्टे. कोतवाली – घरफोडी करण्याचा प्रयत्न करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :</u>

दि. 11.10.18 चे 2000 वा ते 2145 वा दरम्यान पो.स्टे. कोतवाली हद्दीत घर नं. 129/ए कोठी रोड महाल येथे राहणारे फिर्यादी सुयश दिलीप जबलपुरे, वय 20 वर्ष हे त्याचे मोठे वडील यांचे घरी पुजेचे कार्यक्रमाकरीता परीवारासह गेले असता काही वेळाने परत आल्याने त्यांना घराचे कुलूप व कोंडा तुटलेले दिसले आत गेले असता आरोपी शेख छोटु शेख दिलावर, वय 36 वर्ष रा. बाग पिपलगाव ता. गवराई, जि. बीड हा बालकणीमधून पळून जात असतांना वस्तीतील लोकांच्या मदतीने त्यास पकडण्यात आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कोतवाली येथे पोउपनि लाकडे,9823982957 यांनी आरोपीविरूध्द कलम 457,380,511 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>9) पो.स्टे. सक्करदरा – जबरी चोरी :</u>

दि. 11.10.18 चे 1925 वा चे सुमारास फिर्यादी सौ. वंदना प्रविण गुल्हाणे, वय 42 वर्ष रा. एन/138, रेशमबाग, नागपूर या देवीचे दर्शण घेवून घरी पायदळ जात असतांना पो.स्टे. सक्करदरा हद्दीत रेशमबाग ते गजानन चौक मस्केचे घरासमोर 2 अनोळखी आरोपी इसम हे दुचाकीने फिर्यादीचे पाठीमागून येवून एकाने फिर्यादीच्या गळयावर थाप मारून गळयातील सोन्याचे मंगळसुत्र कि. 12,000 रू चा मुद्येमाल जबरीने हिसकावून चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सक्करदरा येथे पोउपनि धडे, 8983072567 यांनी आरोपीविरूध्द कलम 392,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>(अकस्मात मृत्यु)</u>

<u>पो.स्टे. यशोधरानगर, कळमणा :</u>

<u>1) यशोधरानगर</u> – दिनांक 04.10.18 चे 1530 वा चे सुमारास पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत राधाकृष्ण कॉलोनी, साई मंदीर, भिलगाव, कामठी रोड, नागपूर येथे राहणारे गंगाधर मारूती नावरे, वय 30 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 11.10.18 चे 1850 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. यशोधरानगर येथे सपोनि पी. बोंडसे, 9130010625 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>2) कळमणा</u> – दिनांक 11.10.18 चे 2150 वा चे सुमारास गोपाल, वय 25 वर्ष रा. अनंतपुर, (आध्रप्रदेश) हा दहा चक्का ट्रकने उत्तरप्रदेश येथून आलू घेवून नागपूर मार्गे जात असतांना पो. स्टे. कळमणा हद्दीत पारडी चौक येथे हॉटेलमध्ये जेवण करीत असतांना अचानक प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. कळमणा येथे सपोनि ए. मेश्राम, 8308809100 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

<u>(ईतर)</u>

<u>1) पो.स्टे. गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :</u>

दिनांक 11/10/2018 रोजी गोपनिय सुत्राद्वारे माहीती मिळाली की, दिनांक 10/10/18 रोजी एका बसमध्ये कंडक्टर व ड्रायव्हर यांना एक बॅग मिळालेली असुन त्यामध्ये सोन्या व चांदीचे दागीने आहेत अशा खबरेवरून आम्ही व तपास पथक प्रमुख श्री आत्राम व इतर स्टॉफ सह घाट रोड येथील बस आगारात जावुन तेथील अधिकारी आणि कर्मचारी यांना भेटुन विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले कि, दिनांक 10/10/2018 रोजी नागपूर ते गोंदीया येथे ड्रायव्हर नाव – डी.आर. काकडे बस क्र. **MH-14-BT - 5018** घेवुन जात असतांना सदर बसचे कंडाक्टर डब्ल्यु. डी. धार्मीक यांना सदर बसचे मागील लगेज केबीन मध्ये एक काळया रंगाची पाठीला लटकवायची बॅग लावारीस स्थितीत मिळुन आली ती त्यांनी नागपूर ला परत आलेनंतर घाट रोड येथील आगारात जमा केली याबाबत सदर आगाराचे आगार

**व्यवस्थापक सौ शि. भी. सिरसाठ** यांनी इतर स्टॉफसमक्ष सदरची बॅग उघडुन बॅगमध्ये असलेल्या वस्तुचा पंचनामा कारवाई केली व सर्व मुद्देमाल त्यांचे ताब्यात असलेल्या तिजोरीमध्ये सुरक्षीत ठेवला.

सदरचा मुद्देमाल आम्ही दि.11/10/18 रोजी दोन पंच व सोनार यांना बोलावुन सविस्तर लावारीस मुद्देमाल पंचनामा कारवाई करुन ताब्यात घेतला. जप्त केलेला मुद्देमाल खालीलप्रमाणे –

1) सोन्याचे दागीने ज्यामध्ये कानातील जोड, पदक,गउ मणी नाकातील बेसर नथनी व लॉकेट
असे वजनी अंदाजे 157 ग्रॅम 656 मिलीग्रॅम किं. 4,69,249/–रु

2) चांदीचे दागीने ज्यामध्ये तोरडया,आंगठी, गळयातील माळ,जोडवे, मुर्ती, चांदीचे सिक्के, छल्ले
तसेच तावीज,व मोड चांदी असा एकुण वजनी अंदाजे – 7 किलो 175 ग्रॅम किं. 2,35,670

असे सोन्या चांदीचे दागीने एकुण किंमती 7,04,919/–रु चा मद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच नमुद मुद्येमालाबाबत माहिती काढली असता नमुद मुद्येमालाबाबत पो.स्टे. सालेकसा, जि. गोंदिया येथे दि. 08/10/18 रोजी फिर्यादी नामे अरविंद राधेशाम क्षीरसागर, वय–38वर्ष, रा–एकता कॉलनी, सालेकसा यांचे तक्रारी वरून अप.क्र.227/18,कलम–380,34 भादवी अन्वये गुन्हा दाखल असल्याचे समजले. पुढील कारवाई सुरू आहे.

तरी मा. श्री.राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त,परि.क्र.3, मा.श्री.बनसोड, सहा.पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग नागपूर, यांचे मार्गदर्शनाखाली सदरची कामगीरी व.पो.निरीक्षक सुनिल गांगुर्डे, पोउपनि ए.पी.आत्राम, व इतर स्टॉफ यांनी पार पाडली

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर